REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# लोकशाहीर आण्णाभाऊ साठे : लोकनाट्य

प्रा. श्रीरंग शामराव लोखंडे
राज्यशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

**सारांश : -**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी 'लोकनाट्यात' आपले वेगळे स्थान निर्माण केलेले आहे. त्यांनी आपल्या लोकनाट्यातून 'प्रचिती' घडविलेली आढळते. त्यामुळेच त्यांच्या लोकनाट्यातून तत्कालीन वास्तविकतेचे 'भेदक' चित्रण चित्रित होताना आढळते. 'अकलेची गोष्ट' (१९४५) बेकायदेशीर' (१९४७), 'माझी मुंबई' (१९४८), 'लोकमंत्र्याचा दौरा' (१९५२), 'पुढारी मिळाला' (१९५२), याव्यतिरिक्त शेटजीचे इलेक्शन', 'मूक मिरवणूक', इत्यादी एकंदरीत १५ लोकनाट्य प्रसिद्ध आहेत. पुरोगामित्व, भौतिकवाद, तत्कालीन जटील समस्या या बाबी त्यांच्या लोकनाट्याच्या केंद्रस्थानी होत्या.


**बीज शब्द : -** लोकशाहीर, लोकनाट्य, साहित्यसम्राट, पुरोगामित्व भेदक, मानव, तत्कालीन वास्तविकता, दुसरे महायुद्ध, इत्यादी.

## प्रस्तावना : -

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. विविधांगी, विपूल, विस्तृत असे हे लेखन असल्याने त्यांना 'साहित्य सम्राट' या पदवीने रसिकांनी सन्मानित केले. शाहिरीपासून त्यांनी आपल्या कलाविकासाला प्रारंभ केला. लावणी- पोवाडे, वगनाट्य, लोकनाट्य, कथा - कविता, कादंबरी, नाटक इत्यादी वाङ्मय प्रकारात त्यांचे अमूल्य असे योगदान आहे. मानव, त्याभोवती परीघाप्रमाणे असणाऱ्या समस्या त्यांनी आपल्या लोकनाट्यातून चित्रित केल्या.

## लोकनाट्याची व्याख्या -

लोकनाट्य हे दृश्य-श्राव्य स्वरूपात सादर केल्या जाते. मनोरंजन – प्रबोधन यातून होत असतं. बोली, दैनंदिन समस्या, तत्कालीन परिस्थिती याचे चित्रण 'लोकनाट्यातून घडत असते.



१) "लोकसाहित्यात (folklare) मध्ये, 'flok' साठी लोक हा पर्यायी शब्द वापरला जातो. मराठीत 'लोकसाहित्य' हा शब्द इंग्रजीतील ' folklare' चा पर्यायी शब्द म्हणून वापरण्यात येतो. लोकसाहित्यात लोकवाङ्मय, (folk literature) लोकोत्सव, लोकधारणा, लोकरीती, लोकश्रद्धा, लोकदैवत सर्व लोककथा, लोकगीते, लोकात्क्ति, इत्यादीसाठींचे लोकसाहित्य ही संज्ञा गृहीत धरली जाते ; परंतु तो लोकसाहित्याचा एक भाग आहे. व्यापक लोकसंस्कृतीच्या

सर्व अंगासाठी लोकसाहित्य ही संज्ञा सर्व अभ्यासकांनी मान्य केली आहे."[१]

२) "भारतभर सातत्याने प्रत्येक प्रांतातील लोकनाट्य प्राचीन काळापासून त्या त्या लोकपरंपरेतील लोककलावंत करीत आले आहेत. लोककला त्या परंपरेनेच समूहनिर्मित आणि समूहाश्रीची असल्याने त्यांचा साचा सर्वांना परिचित असतो. या लोकनाट्याच्या आविष्काराने असलेला लवचिकपणा, उत्स्फुर्तपणा, बंधन रहितता, ओबडधोबडपणा इत्यादी दोष आजच्या नाटकाच्या तुलनेने जाणवणारे असतील, पण त्या दोषातच लोककलांचे वेगळेपण व त्यांचे अस्तित्व व व्यक्तित्त्व प्रतिबिंबीत झालेले आहे. कारण मूलत: तो समूहमनाचा आविष्कार आहे."[२]

३) "ते साहित्यगुणांनी नटलेले नाही. तर सर्वांना समजणारी नित्याच्या व्यवहारातील साधी बोली तुटपुजी सजावट, कृत्रिमतेचा स्पर्शही न झालेला सहज अभिन्य सामान्य जनास रूचणारे लोकसंगीत आहे"[३]

४) "लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेली मौखिक, अलिखित, गद्यपद्यांचा संगम, बोलीभाषेचा वापर व लोकपरंपरेतून निर्माण झालेली नाटयकृती म्हणजे लोकनाट्य होय."[४]

अशाप्रकारे लोकनाट्याच्या काही व्याच्या आढळतात. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे लोकनाटय वेगळयाप्रकारे आढळते.

### लोकनाट्याचे स्वरूप : -

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या लोकनाट्याचे स्वरूप हे विविधांगी होते. त्या वैविध्यपूर्णतेंत 'मानव' केंद्रबिंदू होता लोकनाट्याचा उगमच मूलत: त्यांच्या कूमारवयात प्रत्ययास आला. "कधीकधी अण्णा, सख्खा मावसभाऊ,बापू साठे यांच्या गावी जायचा. बापूराव होतं अण्णाहून वरीसभर मोठं. पंधरा सोळा वरसाचं होतं. ते सावळजकरांच्या तमाशात नाच्यापोऱ्याचं काम "गुलजार ज्वानीची नार' होऊन करायचं बापू किन्नारीसुरात नारीचा नखऱ्यानं लावणी गायचं अन् अण्णा तुनतून वाजवीत झील धरायचं- अन्नानं तमाशाचा रंगढंग साजबाज बापूकडून असाज उचलला''. अशाप्रकारे अण्णा भाऊ साठेंच्या कलाप्रकाराचा प्रारंभ झाला. त्यांनी एकंदरीत १५ लोकनाट्ये लिहिलीत प्रथमत: त्यांनी लावणी, पोवाडे, वगनाट्ये, लोकनाट्य असा त्यांचा प्रवास झाला. 'अकलेची गोष्ट' (१९४५), 'देशभक्त घोटाळे' (१९४६), 'खापऱ्या चोर' (१९४६), 'बेकायदेशीर' (१९४७), 'माझी मुंबई' (१९४८), 'पुढारी मिळाला' (१९५२) 'लोकमंत्र्याचा दौरा' (१९५२) या व्यतिरिक्त 'शेटजीचे इलेक्शन', 'मूक मिरवणूक' इत्यादी लोकनाट्ये आढळतात.

### दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी : -

अण्णाभाऊ साठे यांनी १९४५-६० या कालखंडात लेखन केलयं. जागतिक स्तरावर बरीच अराजकता होती. ते म्हणजे इ.स. १९३९-४५ हा दुसऱ्या महायुद्धाचा कालखंड. साम्राज्यविस्तार' हा या महायुद्धाचा मुख्य हेतू होता. पहिल्या महायुद्धानंतर लगेच दुसरे महायुद्ध रू झाले. त्यामुळे लोकांना "शांतता" प्रस्थापित करायची होती. परंतु राजकीय वलय साम्राज्यविस्ताराच्या मागे लागलेलं होतं. यात जनसामान्यांची होरपळ होऊ लागली. कामगार वर्गाची पिळवणूक होऊ लागली. रशियामध्ये कार्ल मार्क्स रूजलेला होता. जागतिक स्तरांवर कामगाराच्या समस्या वाढलेल्या होत्या. हळुहळू कार्ल मार्क्स सर्वत्र पसरू लागला. भारतातही त्याचे पडसाद उमटायला लागते, याच पार्श्वभूमीवर अण्णाभाऊ साठे यांनी कामगार जीवनातील असहाय्यता भोगलेली होती. यातील समस्या त्यांनी आपल्या पहिल्या लोकनाट्यात अधोरेखित केलेली आढळतात.

१) अकलेची गोष्ट (१९४५) – रशियामध्ये द.स. १९१७ ला राज्यक्रांती झाली हा कामगारांचा विजय होता. 'कार्ल मार्क्स यांनी कामगारांकरिता दिलेला लढा', हा उद्देश समोर ठेवून या लोकनाट्याची निर्मिती केलेली आढळते.

२) खापऱ्या चोर (१९४६) - दुसरे महायुद्ध समाप्त झाल्यानंतर आर्थिक मंदीने जग ग्रासलं अण्णा भाऊ साठे यांनी ती परिस्थिती अनुभवली त्याचे प्रतिबिंब म्हणजे हे लोकनाट्य होय यामध्ये त्यांनी सेठ, सावकार, जमीनदार यांच्याकडून, सामान्यजनांचे होणारे शोषण. हे व्यक्त करीत त्यांना 'खापऱ्या चोर' (व्यापारी वर्ग) असे म्हटलेले आहे.

३) माझी मुंबई (१९४८) – या लोकनाट्यात अण्णा भाऊंनी 'भाषावर प्रांतरचना' हा विषय मांडलेला आहे. त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई हे होते. ते गुजरातमधील होते. त्याकारणांनी 'मुंबई गुजरातमध्ये समाविष्ट करावी.' असे त्यांचे मत होते. तर 'मुंबई महाराष्ट्रात

असावी.' असे आग्रहाने अण्णाभाऊंनी या लोकनाट्यात सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरत (गुजरात) लूट केल्यानंतर तेथील व्यापाऱ्यांनी मुंबईला प्रयाण केले. हे बोरी बंदर होते. येथे हिऱ्या-माणक्यांचा व्यापार चालत असे. पुढे इंग्रजी राजवटीत बॉम्बे, बम्बई, मुंबई नावानी बोरी बंदर प्रसिद्ध झाले. हा जरी इतिहास, असला तरी मूलत: मराठी वर्ग तिथे मोठया प्रमाणात होता. 'माझी मुंबई' वर असलेले अण्णाभाऊंचे प्रेम यातून प्रतित होते. तसेच 'भाषावार प्रांतरचना' असावी असे त्यांनी या लोकनाट्यात मांडले.

४) लोकमंत्र्यांचा दौरा (१९५२)– हे लोकनाट्य तत्कालीन राजकीय घडामोडीवर आधारित आहे. इ.स. १९५२ ला काँग्रेस सरकार सत्तेवर येणे, स्वतंत्र भारतानंतर ही राजकीय क्षेत्रात घडलेली पहिलीच घटना. मंत्री मंडळातील बऱ्याच मंत्र्यांनी जनतेच्या समस्याचे निवारण न करता त्याकडे दुर्लक्ष केले. ही बाब या लोकनाट्यात मांडण्यात आलेली दिसते. “तमाशा या पारंपारिक लोक कलेला लोकनाट्याचे रूप देऊन अण्णाभाऊंनी लोकनाट्याला मराठी रंगभूमीशी जोडले.”[६]

अण्णाभाऊंच्या इतरही लोकनाट्यात सामाजिक समस्या, तत्कालीन परिस्थिती, राजकीय घडामोडी या बाबींचा त्यांनी अचूक वेध घेतलेला दिसतो.

## वैशिष्ट्ये : -

१) मानव-मानवता हा त्यांचा लोकनाट्याचा मूलाधार आहे.

२) 'मानव' मूलत: केंद्रबिंदू आहे

३) नैतिकता त्यांच्या लोकनाट्यात आढळते.

४) तमाशातील पारंपरिकता नाकारून नव्या मूल्यरचना जोपासण्याचा त्यांचा प्रयत्न अव्दितीय आहे.

५) लोकनाट्याचे विषय तत्कालीन आहे.

६) 'स्त्री' सन्मान लोकनाट्यात दिसतो.

७) सामाजिकतेवर लोकनाट्ये आधारित आहेत.

८) आशयाभिव्यक्ति भिन्न होती.

९) तंत्र कौशल्याचा वापर करताना परंपरागतता नाकारली.

१०) लोकनाट्याचे पूर्णत: स्वरूपच बदलवून टाकले.

इत्यादी वैशिष्टये आढळतात. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी 'लोकनाट्या'त अमूल्य असे योगदान केलेले आहे.

## संदर्भ टीपा : -

१) प्रभाकर मांडे - लोकसाहित्याचे स्वरूप, सविता प्रकाशन औरंगाबाद, १९७८, पृ.१२

२) पु.मा. कालभूत - लोकनाट्य उद्गम आणि विकास, विजय प्रकाशन, नागपूर, १९९६, पृ.२

३) तत्रैव, पृ.२

४) विशाखा संजय कांबळे - लोकनाट्य, देवयानी प्रकाशन, मुंबई, २०१२,पृ.१४.

५) रणधीर शिंदे(संपादक) - अण्णाभाऊ साठे - साहित्य - समीक्षा, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, २०११, पृ.७३

६) सदा क-हाडे - दलित साहित्य चिकित्सा, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, व्दितीयावृत्ती,२००६,पृ. १२२.